**वसई विरार शहर महानगरपालिका**
क्रीडा विभाग, मुख्यालय

---

**प्रेसनोट**

दिनांक. 12/04/2022

## कोरोना काळाआधी तरणतलावासाठी आगाऊ रक्कम भरलेल्या सभासदांना मुदतवाढ.

कोविड-19 विषाणुच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे दिनांक 14 मार्च 2020 रोजी पासून मा.राज्यशासन व वसई विरार शहर महानगरपालिकेने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार महानगरपलिकेचे तीनही जलतरण तलाव पुर्णपणे बंद करण्यांत आले होते.

सद्यस्थितीमध्ये शहरात कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव कमी होत असल्याने मा.राज्यशासन यांचे दिनांक. 1/03/2022 रोजीच्या आदेशान्वये तसेच मा.आयुक्त तथा प्रशासक, वसई विरार शहर महानगरपालिका यांचे दि.08/03/2022 रोजीच्या आदेशान्वये महानगरपालिकेचे जलतरण तलाव सर्वांकरिता सरावासाठी खुले करणेबाबत आदेशीत केले आहे.

कोविड-19 विषाणुच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे ज्या कालावधीकरिता महानगरपालिकेचे जलतरण तलाव बंद करण्यांत आले होते, त्या कालावधीत सभासदांना जलतरण तलाव मध्ये सराव करता आला नाही. त्यामुळे ज्या कालावधीकरिता जलतरण तलाव बंद करण्यांत आले होते, तीतकाच कालावधी सभासदास मुदतवाढ देणेबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या विचाराधीन होता. त्यानुसार मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी प्रशासकीय ठराव क्र. 21 दिनांक. 11/04/2022 अन्वये कोरोना काळाआधी तरणतलावासाठी आगाऊ रक्कम भरलेल्यांना मुदतवाढ देणेंस मंजुरी दिली आहे.

तरी कोरोना काळाआधी जलतरण तलावात सरावाकरिता आगाऊ फी भरलेल्या सभासदांना ज्या कालावधीत महानगरपालिकेचे तिन्ही जलतरण पुल बंद करण्यांत आले होते, तीतकाच कालावधी त्यांनी भरलेल्या फी ला अनुलक्षुन वाढीव मुदत देण्यांत येत आहे. याची सर्व सभासदांनी नोंद घ्यावी. तसेच सदरची माहिती मिळताच एक महिन्याच्या मुदतीत आपण महानगरपालिकेच्या त्या-त्या जलतरण तलाव कार्यालयात भेट देवून वाढीव मुदत सभासद कार्ड तयार करुन घेणे सभासदावर बंधनकारक राहील. यासाठी फी भरलेली पावती अथवा जुना पास सोबत घेऊन येणे सभासदास बंधनकारक असेल.

सद्यस्थीतीत प्रभाग समिती ‘आय’ मधील तामतलाव व प्रभाग समिती ‘एच’,अंबाडी रोड तरणतलाव सर्वांसाठी सुरु करण्यांत आले आहेत. प्रभाग समिती ‘सी’, कार्यालय हद्दीतील पापडखिड तरणतलावाचे दुरुस्तीचे काम महापालिकेने हाती घेतले असल्याने सदरचा तरणतलाव बंद असणार आहे. पापडखिंड तरणतलाव सुरु होताच प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविण्यांत येईल.

तसेच प्रभाग समिती ‘आय’ मधील तामतलाव व प्रभाग समिती एच,अंबाडी रोड तरणतलाव येथे नविन सदस्य नोंदणी फॉर्म सोमवार दिनांक. 25/04/2022 रोजी पासून उपलब्ध होतील.

क्रीडा विभाग,
वसई विरार शहर महानगरपालिका